समंस प्र..क. ५६६/२०१७
ग्राम विकास वि. बाबाराव
नि.क. : ४ **पुढे सुरु**

**(नि.क. २० वरील पुरसिस नुसार नि.क. ४ वरील सत्यापनास सरतपास म्हणुन साक्ष घेण्यात येत आहे.)**

साक्षीदाराचे नावः- विजय बाबुराव दोडके,
वय :- ३८
व्यवसाय :- लिपीक, ग्रामविकास सोसायटी थुगावदेव
राहणार :- थुगावदेव, ता. नरखेड, जि. नागपुर

<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क. ०१ चा पुढील सरतपास फिर्यादीचे विद्वान विधीज्ञ श्री. एम. आर. चरडे यांच्या मार्फत शपथेवर सुरुः-</u>

मी शपथेवर खरे सांगतो की,

**१.** आता मला माझा साक्ष प्रतिज्ञालेख दाखविण्याल आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर असुन, माझ्या सांगण्याप्रमाणे लिहलेला आहे. साक्ष प्रतिज्ञालेखावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. साक्ष प्रतिज्ञा लेख **नि.क. ४** वर आहे.

**२.** आता मला अभिलेखावर दाखल असलेला मुळ धनादेश दिनांक १८.०७.२०१७ कमांक ९३२०३७ दाखविण्यात आला. त्यावर आरोपीची सही आहे, त्याने ती माझेसमक्ष केली आहे. सदरील धनादेशाला **नि.क. २१** देण्यात येते.

**३.** आता मला अभिलेखावर दाखल दि. २३.०८.२०१७ रोजीचा बॅक रिटर्न मेमो दाखविण्यात आला. त्यावर बॅकेच्या अधिका-याची सही आहे. याला **नि.क.२२** देण्यात येते.

**४.** आता मला अभिलेखावर दाखल नोटीसची स्थळप्रत दाखविण्यात आली, त्यावर माझी व माझे वकीलांची सही असुन त्यास त्यातील मजकुर बरोबर असुन सदर स्थळप्रतीला **नि.क. २३** देण्यात येते.

**५.** पोस्टाच्या पावतीला **नि.क.२४** देण्यात येते.

**६.** आता मला अभिलेखावर दाखल असलेला आरोपीस माझे वकीलामार्फत दिलेल्या नोटीसचा बंद लिफाफा ज्यावर सतत गैरहजर मुदत संपली सबब सेंडरला वापस असलेला शेरा दाखविण्यात आला, तो तोच असुन माझे विधीज्ञांनी पाठविलेला आहे. सदर बंद लिफाफयास **नि.क. २५** देण्यात येते. बंद लिफाफा खुला न्यायालयात उघडण्यात आला, त्यामध्ये असलेली नोटीस मला दाखविण्यात आली, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, त्यास **नि.क. २६** देण्यात येते.

**६**. आता मला अभिलेखावर दाखल असलेली ठरावाची सत्यप्रत दाखविण्यात आली, त्यावर ग्रामविकास बिगरशेती सहकारी पतसंस्था यांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची सही आहे. सदर ठरावाच्या सत्यप्रतीला **आर्टीकल अ** देण्यात येते.

**आरोपी व आरोपीचे विदवान विधीज्ञ यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर, करीता उलटतपास नाही.**

वा.दा.ब.अ.क.के.

( एन.बी.राठोड )
प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी
नरखेड.
दि. २२.०२.२०२१

समक्ष,

( एन.बी.राठोड )
प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी
नरखेड.
दि. २२.०२.२०२१